मोटार अपघात प्रकरण क्र. २०१/२०२३
अश्विनी वि.बालाजी व इतर
नि.क्र. ३५ **CW**–२

**<u>शपथेवर उलटतपास गैरअर्जदार क्र.१ व २ तर्फे ॲडव्होकेट श्री. अजिंक्य परशेट्टी</u>**

४. गैरअर्जदार क्र.१, २ व त्यांचे वकिल गैरहजर, सबब उलटतपास नाही.

**<u>गैरअर्जदार क्र.३ तर्फे ॲडव्होकेट श्री. एस.जी. डोईजोडे</u>**

५. महेश माझा सख्खा भाऊ होता. शपथपत्रातील मजकुर तयार करुन ठेवलेला होता. त्यावर सहया करा म्हणल्याने मी सहया केल्या. अपघात झाला त्यावेळी मी आणि महेश वेगवेगळया गाडयांवर तांदुळजा येथे जात होतो. भावाला ट्रॅक्टरने धडक दिल्यानंतर मी त्याला लातूर येथील सरकारी दवाखान्यात घेऊन गेलो. सरकारी दवाखाना, लातूर येथे पोलीस चौकी आहे. सरकारी दवाखान्यातील पोलीस चौकीमध्ये मी लेखी तक्रार दिली नव्हती. अपघाताची वेळ रात्री १०.३० अशी होती. अपघात झाल्यानंतर ट्रॅक्टर घटनास्थळीच होता. पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ पंचनामा केला होता. घटनास्थळ पंचनामा अपघाताच्या एक महिन्यानंतर केला. पंचनामा केला त्यावेळी मला ट्रॅक्टरचा नंबर माहित होता. पंचनामा करतेवेळी संबंधीत पोलीस अधिका–याला ट्रॅक्टरचा नंबर सांगितला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला त्यामध्ये ट्रॅक्टरचा उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो की माझा भाऊ माझ्यासमोर गाडी चालवता असताना त्यास वांजरखेडा गावातून गाधवडकडे वळणारे ट्रॅक्टरचे हेडने अचानक समोर येऊन जोराची धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो की त्या ट्रॅक्टरचा क्र.एम.एच.४४/झेड–१२१७ असा होता आणि ट्रॅक्टरीचा चालक ट्रॅक्टर रोडवर उभा करुन पळून गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे ट्रॅक्टर अपघातामध्ये सहभागी नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, भावाच्या पत्नीला मदत

करण्यासाठी हे मी खोटे शपथपत्र दिले आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

Digitally signed by VIDYADHAR SHESHARAO MORE
Date: 2026.05.04 17:43:07 +0530

( विद्याधर शे. मोरे )
सदस्य
मोटार अपघात प्राधिकरण, लातूर

दिनांक :–०४/०५/२०२६